


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com   RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे   अंक : ३२९ वा   शुक्रवार दि २७ मार्च २०२६   पृष्ठ ८   किमंत ३ रुपये

# अशोक खरातसोबतचे हेमंत गोडसे, अतुल सावेंचे फोटो दाखवत सुषमा अंधारे संतापल्या...

## दीपक केसरकरांच्या एसआयटी चौकशीची केली मागणी...

वृत्तसंस्था/ नाशिक

ननाशिकमधील बहुचर्चित अशोक खरात प्रकरणावरून ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आज त्यांनी एसआयटीची भेट घेतली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी थेट अनेक फोटो सादर करत सत्ताधारी पक्षातील अनेक बड्या नेत्यांवर आरोप केले आहेत. हा भस्मासूर कुणी पोसला आणि त्याला आर्थिक रसद कुणी पुरवली, याची नावे आता उघड झाली पाहिजेत, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. सत्ताधाऱ्यांकडून होत असलेल्या आरोपांना प्रत्युत्तर देताना अंधारे म्हणाल्या की, काल कुणीतरी एक बोलघेवड्या बाई ताज हॉटेलचे संदर्भ देऊन बिनबुडाचे आरोप करत होत्या. मी आज पुराव्यासकट बोलत आहे. माझ्याकडे असलेले फोटो हे केवळ योगायोग नाहीत. यात अतुल सावे दिसतायत, याचा अर्थ ते गुन्हेगार आहेत असे माझे म्हणणे नाही, पण या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. सुषमा अंधारे यांनी माजी खासदार हेमंत गोडसे यांचे काही फोटो माध्यमांना दाखवले. त्या म्हणाल्या, हेमंत गोडसे एका फोटोत भूमिपूजन करताना दिसत आहेत. समोर नारळ आहे आणि त्यांच्यासोबत या प्रकरणातील मुख्य संशयित खरात दिसत आहे. हे भूमिपूजन सिन्नर एमआयडीसीशी संबंधित आहे. जर हे केवळ सामाजिक उपक्रम होते, तर मग तिथे एमआयडीसीचा सर्व स्टाफ काय करत होता? याचे उत्तर आता त्या बोलघेवड्या प्रवक्त्यांनी दिले पाहिजे. या प्रकरणात माजी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचे नाव घेत अंधारे यांनी खळबळ उडवून दिली. त्यांनी एका बॅनरचा फोटो दाखवत प्रश्न उपस्थित केला की, सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहतीचा तो बॅनर आहे. तिथे शालेय शिक्षण मंत्र्यांचे काय काम? शिक्षण खात्याचा संबंध एमआयडीसीशी कसा काय आला? मी यासंदर्भात एसआयटीला () पत्र दिले असून केसरकरांची चौकशी करण्याची मागणी केली आहे.



पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, माझ्या नेत्याबद्दल मी गॅरंटी देते, पण तुम्ही या नेत्यांना कसं प्रोटेक्ट करणार आहात ते सांगा. मी अजून संशोधन करेन आणि या प्रकरणाच्या मुळाशी जाईन. मला नाशिकच नाही, तर इतरही अनेक गोष्टींचे संशोधन करायचे बाकी आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यावरही अंधारे यांनी निशाणा साधला. चाकणकर म्हणतात की त्या केवळ सामाजिक उपक्रमांसाठी भेटत होत्या. पण एका फोटोत कॅबिनेट मंत्री शांत उभे आहेत आणि स्वयंघोषित राज्यमंत्री पदाचा दर्जा लावणाऱ्या बाईंचा सत्कार होतोय, बाजूला खरात उभा आहे. ये रिश्ता क्या कहलाता है? हे आता स्पष्ट व्हायला हवे, असे त्या म्हणाल्या. या सर्व फोटोंचे इनपुट आपण एसआयटीकडे सोपवले असून, या प्रकरणातील मास्टरमाइंड कोण आहे हे समोर आणल्याशिवाय शांत बसणार नाही, असा इशारा यावेळी सुषमा अंधारे यांनी दिला आहे.

# अजित पवारांच्या प्रकरणात महाराष्ट्रात घेईनात, रोहित पवारांनी शक्कल लढवली; थेट कर्नाटकात तक्रार दाखल...

वृत्तसंस्था/मुंबई

बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी आमदार रोहित पवार यांच्याकडून बेंगळुरू येथे झिरो एफआयआरफ दाखल करण्यात आली आहे. हा अपघात नसून, घातपात होता, असा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, हा गुन्हा आता बारामती पोलिसांकडे वर्ग होईल. मुंबईहून २८ जानेवारीला बारामतीकडे जाणारे खासगी ङ्किलअरजेट ४५फ विमान बारामती विमानतळाजवळ कोसळले होते. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पायलट, सहपायलट आणि अन्य कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. रोहित पवार यांनी यापूर्वी मुंबईतील मरिन ड्राइव्ह पोलिस ठाणे आणि बारामती पोलिसांकडे तक्रार देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, एफआयआर नोंदवली गेली नाही. पुणे सीआयडीकडून केवळ ॲक्सिडेंटल डेथफच्या दृष्टीने तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानंतर अखेर कर्नाटकातील बेंगळुरू येथील हाय ग्राउंड्स पोलिस ठाण्यात झिरो एफआयआरफ दाखल करण्यात आली असून, पुढील तपासासाठी ती महाराष्ट्र पोलिसांकडे वर्ग करण्यात आली आहे. विमान उतरण्यासाठी पाच किलोमीटरची दृश्यमानता आवश्यक असते. मात्र, दोन-तीन किलोमीटर दृश्यमानतेवर परवानगी दिली गेली. उड्डाणास विलंब, धावपट्टी बदलण्याचा निर्णय, आणि ऐन वेळच्या घडामोडी यामुळे हा अपघात केवळ दुर्घटना नसून, कटकारस्थानाचा भाग असू शकतो, असा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी कर्नाटकमध्ये तक्रार दाखल करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शपचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी विधानसभेत दिली. या अपघातप्रकरणी मी मरिन लाइन्स पोलिस ठाण्यामध्ये गेलो, मात्र तेथे तक्रार नोंदवून घेतली नाही. तुम्हाला सत्तेत बसविणाऱ्या अजित पवार यांच्या विमान अपघाताचा अद्याप एफआयआर दाखल करण्यात आला नाहीफ, असे ते अंतिम आठवडा प्रस्तावादरम्यान म्हणाले. ङ्कमुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी एकत्रित बैठक घेऊन एफआयआर दाखल करून तपासाबाबत न्याय द्यावा अशी मागणी पवार यांनी केली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड



# आर्थिक समस्येचे सावट



अमेरिकेच्या आर्थिक क्षेत्रातून ज्या बातम्या येत आहेत त्या थोड्याफार प्रमाणात २००८मध्ये घडलेल्या ङ्कसबप्राइमम संकटाची आठवण करून देणाऱ्या आहेत. त्यातील काही खासगी क्रेडिट फंडांशी संबंधित आहेत. ज्या कंपन्यांना बँकिंग व्यवस्थेमधून कर्ज मिळत नाही, म्हणजेच बँकिंग व्यवस्थेसाठी या कंपन्या ङ्करिस्कीफ असतात, अशा कंपन्यांना हे ङ्कखासगी क्रेडिट फंडफ पैसे देतात. या खासगी क्रेडिट फंडामध्ये गुंतवणूकदारांनी पैसे गुंतवलेले असतात. हे पैसे काढून घेताना या गुंतवणूकदारांना काही निर्बंधांचा सामना करावा लागतो आहे. ब्लू आऊल, ब्लॅक रॉक, ब्लॅक स्टोन, अपोलो ही अमेरिकेतील काही खासगी क्रेडिट फंडांची उदाहरणे. पैसे काढून घेण्यावर निर्बंध लादल्याने या कंपन्यांकडे गुंतवणूकदारांनी जी रक्कम मागितली होती त्याच्या काही टक्के रक्कम मिळेल, असे या फंडांनी जाहीर केल आहे. हा विषय खरे तर खासगी क्रेडिट फंडांची संबंधित आहे. त्याचा पूर्ण बँकिंग व्यवस्थेवर व्यापक परिणाम होणार नाही, असे कुणास वाटत असेल तर ते तसे नाही. ७ ऑगस्ट २०२५ रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक ङ्कएक्झिक्युटिव्ह ऑर्डरफकाढली. अमेरिकेमध्ये ४०१ ही गुंतवणूक आहे. ती गुंतवणूक खासगी क्रेडिट फंडांना वापरता येईल, असे त्या आदेशात म्हटले होते. ४०१ गुंतवणूक म्हणजे काय? तर आपल्याकडे पगारदार कर्मचाऱ्यांसाठी जशी भविष्यनिर्वाह निधीची व्यवस्था असते, त्याचप्रमाणे अमेरिकेमध्ये पेन्शन फंड, वेल्थ फंड असतो; त्याला ४०१ असे म्हटले जाते. या पेन्शन फंड किंवा वेल्थ फंडमधील रक्कम खासगी क्रेडिट फंडांना वापरायला परवानगी देण्यात आली. त्यामुळे अमेरिकेतील बड्या बँकर्सनी खासगी क्रेडिट फंड सुरू केला आणि ही गुंतवणूक वापरली. त्याच्यामध्ये ब्लॅक स्टोन, ब्लॅक रॉक यांसारखी मोठी नावे आहेत. त्याचबरोबर जे. पी. मॉर्गन, मॉर्गन स्टॅन्ली हेसुद्धा आहेत. हे सगळेच अमेरिकेतील मोठे बँकर्स आहेत. त्यांनी खासगी क्रेडिट फंडामधून गुंतवणूकदारांना पैसे काढण्यासाठी निर्बंध लादले. याचा अर्थ त्यांच्याकडे आता गुंतवणूकदारांना परत देण्यासाठी पैसे नाहीत किंवा त्यांनी ते अशा ठिकाणी गुंतवले आहेत, की ते लगेच काढून गुंतवणूकदारांना देता येत नाहीत. त्यामुळे गुंतवणूकदार अडचणीत आले आहेत.

आमच्या अपेक्षेपेक्षा अधिक गुंतवणूकदारांनी पैसे परत मागितल्याने आम्ही ते देऊ शकत नाही, असे म्हणणे या कंपन्यांनी मांडले आहे. त्यातील ब्लू आऊल कंपनीच्या क्रेडिट फंडातून पैसे काढण्यावर पूर्णच बंदी घातलेली आहे. म्हणजे गुंतवणूकदार या क्रेडिट फंडातून पैसे काढूच शकत नाहीत. म्हणजे या फंडांकडे गुंतवणूकदारांना परत देण्यासाठी आत्ता रोख रक्कम नाही. आणि ही गोष्ट फक्त खासगी क्रेडिट फंडापुरती मर्यादित राहत नाही, कारण त्या खासगी क्रेडिट फंडामध्ये पेन्शन फंड, वेल्थ फंड यांचे पैसे गुंतवलेले आहेत. या गोष्टीचा बँकिंग क्षेत्रावर परिणाम झाल्यास त्याची व्याप्ती वाढू शकते, असे या विषयातील जाणकार सांगत आहेत. या घडामोडींचा परिणाम म्हणून, ब्लॅक रॉक, केकेआर, अपोलो ग्लोबल मॅनेजमेंट, एस मॅनेजमेंट, ब्लू आऊल कॅपिटल, टीपीजी या सर्व कंपन्यांचे शेअर पाच ते सहा टक्क्यांनी घसरले. ङ्कफिचफ या रेटिंग संस्थेच्या निरीक्षणानुसार अमेरिकेतील खासगी क्रेडिट पोर्टफोलिओचा डिफॉल्ट दर २०२५मध्ये ९.२ टक्के या विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. सन २०२४मध्ये हा दर ८.१ टक्के होता. जगभरातील १.७ ते दोन ट्रिलियन डॉलर इतक्या आकाराच्या खासगी क्रेडिट बाजारावर सध्या मोठा ताण निर्माण झाला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर संपूर्ण बँकिंग व्यवस्थेला फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिकेतील वाहन उद्योगाशी संबंधित असलेल्या तीन कंपन्यांनी ऑक्टोबर महिन्यात दिवाळखोरी जाहीर केली. फर्स्ट ब्रँड्स, ट्राय कलर आणि प्रायमा लेंड या त्या तीन कंपन्या आहेत. फर्स्ट ब्रँड्स ही कंपनी वाहन क्षेत्राला लागणारे सुटे भाग बनवते. त्यांच्यावरील कर्जाचे प्रमाण हे त्यांच्या मालमत्तेपेक्षा तीन ते पाच पटीने जास्त झाले असून आर्थिक संकटामुळे ते फेडता येणे शक्य नाही, असे कंपनीने जाहीर केले आहे. ट्राय कलर आणि प्रायमा लेंड या कंपन्या कर्ज पुरवणाऱ्या कंपन्या आहेत. त्यांनी त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक कर्जाचे वितरण केले. या दिलेल्या कर्जाची परतफेड न झाल्यामुळे या दोन्ही कंपन्यांना सध्या मोठ्या आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागते आहे. या तीन कंपन्यांनी दिवाळीखोरी जाहीर केल्यानंतर ब्रिटनच्या मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर अँड्रू बेली यांनी सन २००८मध्ये आलेल्या सबप्राइम संकटाची आठवण करून दिली. सन २००८मध्ये लेहमन ब्रदर्स, मेरिल लिंच आणि एआयजी या तीन कंपन्यांनी दिवाळखोरी जाहीर केली. त्यानंतर शेअर बाजारात प्रचंड मोठी उलथापालथ झाली. युरोपीय राष्ट्रांनादेखील फार मोठा आर्थिक धक्का बसला. फेडरल रिझर्व्हने घेतलेला ङ्कसबप्राइम लेंडिंगफ्चा निर्णय घातक ठरला. सबप्राइम लेंडिंग म्हणजे कर्जासाठीच्या नियमांत शिथिलता आणणे. कर्ज घेणारे जे उत्पन्न दाखवतील तेच योग्य आहे असे गृहीत धरून बँकांनी कर्जे दिली. कर्जे देताना त्याबाबत योग्य ती शहानिशा करण्यात आली नाही. कर्ज परतफेड करण्याची ऐपत नव्हती अशा व्यक्तींनाही कर्जे मिळाली आणि पुढे बँकांची अवस्था वाईट झाली. पुढे तीन-चार वर्षे आर्थिक मंदीला सामोरे जावे लागले. त्यातून बाहेर पडायला बराच वेळ लागला. जेव्हा लेहमन ब्रदर्स, मेरिल लिंच आणि एआयजी यांनी दिवाळखोरी जाहीर केली तेव्हा इतर देशांनी, हे आर्थिक संकट किती मोठे असू शकेल, अशी चिंतायुक्त विचारणा केली होती. त्या वेळी, हे खूप मोठ्या आर्थिक व्यवस्थेचा अतिशय लहान भाग आहे, असे उत्तर अमेरिकेने दिले होते.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# आकाश-पाताळ एक करु, कुणाचा बाप जरी असला तरी त्याचा मुर्दाही खोदून काढू'

**मुंबई/वृत्तसंस्था :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणावर आज विधानसभेत निवेदन मांडलं. यावेळी त्यांनी अपघात प्रकरणात आतापर्यंत काय-काय तपास झाला आणि तपासातून काय माहिती मिळाली, याबाबत सविस्तर विश्लेषण केलं. यावेळी त्यांनी आमदार रोहित पवार यांच्या आरोपांना देखील प्रत्युत्तर दिलं. त्यांनी रोहित पवारांना अजित पवारांच्या अपघात प्रकरणी सखोल तपास करण्याचं आश्वासन दिलं. तसेच या प्रकरणात जो दोषी असेल त्याला शोधून काढू, असंदेखील आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.मला असं वाटतं की, आपल्या भावना तीव्र असल्यामुळे आपण काँग्रेस नेते राहुल गांधी यांना भेटलात. राहुल गांधींनी आपल्याला सांगितलं की, तुम्ही कर्नाटकमध्ये जावून FIR दाखल करा. कर्नाटकमध्ये झिरो FIR दाखल झाला, ते ठिक आहे, त्यांनी नसेल सांगितलं, तुम्हाला वाटलं असेल, मी तुम्हाला सांगतो, हा झिरो एफआयआर घेण्याचा अधिकारच कर्नाटकला नाही. हे बेकायदेशीर आहे. कारण झिरो एफआयआर घेण्यासंदर्भातील नियमच असा आहे



की, ज्यावेळी पीडित एफआयआर करण्याच्या परिस्थितीत नसेल त्यावेळेच झिरो एफआयआर करता येतो. अशा पद्धतीने एफआयआर घेण्याचा अधिकार कर्नाटकला नाही", अशी भूमिका मुख्यमंत्र्यानी मांडली.कर्नाटकने हे जे काही केलं आहे, हीच पद्धत ठेवली तर आमचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील मुंबईच्या पोलीस ठाण्यात कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांच्या विरोधात झिरो एफआयआर नोंदवतील. माझ्या दबावापोटी समजा नोंदला गेला, तर तो झिरो एफआयआर नोंदला जाईल. याकरता झिरोप एफआयआर नाही. तुम्हाला वाटतं की FIR झाला पाहिजे, तर तुम्हाला 175 (3) अधिकार दिला आहे, त्या कायद्यानुसार तुम्हाला कोर्टात जाता येतं आणि कोर्ट एफआयआर दाखल करण्याचे आदेश देतं. कर्नाटकने राजकीयदृष्ट्या महाराष्ट्रात तपास बरोबर सुरु नाही. कुठल्यातरी दबावात तपास सुरु आहे, अशाप्रकारे महाराष्ट्राची मानहानी व्हावी म्हणून FIR रजिस्टर केला आहे. खरंतर कर्नाटकमधीन पोलीस ठाण्याने तुम्हाला सांगायला हवं होतं की, ही झिरो एफआयआरची केस नाही", असं रोखठोक मत मुख्यमंत्र्यांनी मांडलं."मी तुम्हाला आश्वासित करतो, तुमच्या मनात शंका ठेवू नका. आकाश पाताळ एक करु पण या केसमध्ये कुणाचा घातपात असेल, कुणाचा बाप जरी असला तरी त्याला खोदून काढू. सहन करणार नाही. कदाचित तुमच्या तीव्रतापेक्षा माझी तीव्रता कमी असेल पण ती बोथट नाहीय की, अजित दादांच्या केसमध्ये कुणी कॉन्स्परेन्सी करेल आणि आम्ही त्याला सोडून देऊ. त्याचा मुर्दाही खोदून काढू एवढं तुम्हाला आश्वासन देतो. तुम्ही जे प्रयत्न करतात त्याचं माझं समर्थन आहे. मी त्या विरोधात नाही. फक्त ते प्रयत्न करत असताना माझी तुम्हाला विनंती आहे. तुम्ही तरुण आहात. इतरांची तीव्रता कमी आहे, असं तुम्ही समजू नका", असं देवेंद्र फडणवीस रोहित पवारांना उद्देशून म्हणाले.अजित दादा रोहित पवार यांचे काका होते, त्यांचे ते जास्त जवळचे असतील, पण आमचेही मित्र होते. मला तर असं वाटतं की, गेल्या पात ते आठ वर्षांत जेवढी माझ्याशी मैत्री होती तेवढी कदाचित राजकारणात फार कुणाशी असेल असं मला वाटत नाही. त्यांच्या जवळचेही ते सांगतील. त्यामुळे आम्ही कुठतेरी त्यांच्या अपघात प्रकरणात एफआयआर होऊ नये हे का करणार? आपल्याला क्रिमिनल जस्टीस सिस्टीममध्ये नियमानुसार काम करावं लागतं. FIR होतो ना, उदाहरणार्थ मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना कुणी बुक्की मारली तर FIR होऊन जाईल. कारण ते हर्ट आहे. हा अपघात असल्याने आधी ADR होतो, हा ADR च नंतर FIR मध्ये कनवर्ट होतो. त्याची प्रोसेस चालली आहे", असं स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.

## तुमच्या शेताकडे जाणारा रस्ता अडवणाऱ्यावर आता कठोर कारवाई होणार, फडणवीस सरकारचा निर्णय

**मुंबई/वृत्तसंस्था :** शेत आणि पाणंद रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्या किंवा रस्त्याचे नुकसान करणाऱ्यांविरोधात आता कठोर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे. अशा व्यक्तींचे आधार कार्ड आणि फार्मर आय-डी तब्बल 5 वर्षांसाठी ब्लॉक करण्यात येणार आहे. यामुळे संबंधित व्यक्ती शासनाच्या विविध योजना आणि मदतीसाठी अपात्र ठरणार आहे. "मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजने"च्या अंमलबजावणीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निर्णय घेतला. महसूल विभागाने या बाबतचा आदेश जारी केला. गाव नकाशावर असलेल्या किंवा शासकीय जागेतील रस्त्यांवर अतिक्रमण असल्यास, तहसीलदार संबंधितांना ७ दिवसांची नोटीस देतील. या मुदतीत अतिक्रमण न काढल्यास शासन स्तरावरून ते हटवले जाईल. विशेषतः ज्या ठिकाणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता किंवा मामलेदार अधिनियमान्वये शेतकऱ्यांना ये-जा करण्याचा हक्क मिळाला आहे, अशा रस्त्यांवर कोणालाही पीक लागवड करता येणार नाही.या योजनेसाठी कोणतेही भूसंपादन केले जाणार नाही. जे शेतकरी स्वतःहून जमीन देतील, त्यांना नोंदणीकृत दानपत्र किंवा हक्कसोड पत्र करून द्यावे लागेल. अशा नोंदणीसाठी आवश्यक असणारे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी माफ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सरकारने घेतला आहे. एकदा दिलेली जमीन पुन्हा परत मागण्याचा हक्क शेतकऱ्याला राहणार नाही.विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये ५ प्रगतशील शेतकऱ्यांची निवड करण्याची पद्धतही बदलण्यात आली आहे. आता संबंधित विधानसभा क्षेत्रातील कोणत्याही ५ शेतकऱ्यांचा समावेश करण्याचा अधिकार समितीचे अध्यक्ष म्हणून स्थानिक आमदारांना देण्यात आला आहे.निविदा भरताना कंत्राटदारांना १५ लाख रुपये किंवा कामाच्या २ टक्के रक्कम (यापैकी जी जास्त असेल ती) सुरक्षा ठेव म्हणून भरावी लागेल. कामात कसूर केल्यास कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकले जाईल.

## राजीनामा की अभय? आक्षेपार्ह व्हायरल व्हिडीओनंतर नरहरी झिरवाळ याचं पद पुन्हा धोक्यात

**नाशिक/वृत्तसंस्था :** मंत्रालयातील लाच प्रकरणातून सहिसलामत सुटलेले अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ पुन्हा अडचणीत आले आहेत. मुंबईतील 'सुरूची' या शासकीय निवासस्थानात एका तृतीयपंथीसोबतचा आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल झाल्याने झिरवाळांचे मंत्रिपद पुन्हा धोक्यात आले आहे. विधिमंडळाचे अधिवेशन संपल्याच्या दिवशी मंत्री झिरवाळ यांचा मुंबईतील शासकीय निवासस्थानातील तृतीयपंथीसोबतचा आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल झाला. तृतीयपंथी पवन यादवसोबतच्या या व्हिडिओमुळे शासकीय निवासस्थानाचा दुरुपयोग होत असल्याचा आरोप केला जात आहे.मंत्रालयातील लाच प्रकरणातही झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्यातून दिलासा मिळाल्यानंतर झिरवाळ या आक्षेपार्ह व्हिडिओमुळे पुन्हा अडकले आहेत.भोंदूबाबा खरात प्रकरणात डझनभर मंत्र्यांच्या अश्लील व अश्लाघ्य कारनाम्याने महाराष्ट्राची पुरती नाचक्की झालेली असताना झिरवाळ यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होणे हे राज्याच्या राजकारणातील नैतिक अधःपतनाचे ज्वलंत उदाहरण आहे. सरकारने झिरवाळांची मंत्रिपदावरून तत्काळ हकालपट्टी करावी,' अशी मागणी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली सरकारकडे आहे.राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांच्या मागे लागलेले शुक्लकाष्ठ संपत नसल्याचे चित्र आहे. मस्साजोगच्या देशमुख हत्याकांडात धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला होता. पाठोपाठ नाशिकचे क्रीडामंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाच्या शिक्षेप्रकरणी राजीनामा द्यावा लागला होता. आता राष्ट्रवादीतील अंतर्गत वर्चस्ववादातून झिरवाळ यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आल्याने राष्ट्रवादीची अडचण झाली आहे. या प्रकरणात झिरवाळ यांची 'विकेट' पडल्यास जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या दुसऱ्या मंत्र्याची गच्छंती होईल.



झिरवाळांनी केलेल्या या कृत्यामुळे त्यांचे शासकीय निवासस्थान त्वरित काढून घ्यावे व कुंभमेळ्याच्या कुठल्याही नियोजन बैठकीला त्यांना बोलवू नये,' अशी मागणी काँग्रेसचे शहराध्यक्ष आकाश छाजेड यांनी केली आहे. काँग्रेसच्या सर्व शाखांकडून आज, शुक्रवारी झिरवाळ यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन केले जाणार असल्याची माहितीही ॲड. छाजेड यांनी या वेळी दिली.

संबंधित व्हिडिओ 'एडिट' केला आहे. त्यामुळे या प्रकाराशी माझा काहीही संबंध नाही. याबाबत मला अधिक बोलायचे नाही.

## हॉस्पिटलच्या सोफ्यावर तळमळत होतो ; सोनिया गांधी रुग्णालयात, राहुल चिंतेत

**तिरुअनंतपुरम/वृत्तसंस्था :** काँग्रेस च्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांना गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीतील सर गंगा राम रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पोट आणि मूत्रमार्गाच्या संसर्गामुळे मंगळवारी रात्री १० वाजताच्या सुमारास ७९ वर्षीय सोनिया गांधी यांना रुग्णालयात ॲडमिट करण्यात आलं. काँग्रेस खासदार राहुल गांधी आपल्या आईची देखभाल करण्यासाठी रुग्णालयातच थांबले आहेत.राहुल गांधी यांनी काँग्रेस पक्षाच्या सोशल मीडिया अकाऊण्टवर एक व्हिडिओ पोस्ट करत म्हटलं आहे की, "मी रुग्णालयात माझ्या आईच्या खोलीत असलेल्या एका लहानशा सोफ्यावर झोपलो होतो. कोणत्याही मुलाप्रमाणेच मलाही माझ्या आईच्या प्रकृतीबद्दल मनापासून काळजी वाटत आहे. मात्र केरळमधील एका नर्सने माझ्या



आईची अत्यंत उत्तम प्रकारे काळजी घेतली, त्यामुळे आईला दिलासा मिळाला."खरं तर सोनिया गांधी यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे राहुल यांनी बुधवारी संसद भवनात आयोजित सर्वपक्षीय बैठकीला हजेरीही लावली नाही. त्यांचा केरळचा नियोजित दौराही रद्द करण्यात आला. त्यांच्या जागी मल्लिकार्जुन खर्गे दौऱ्यावर गेले. राहुल यांनी उपस्थितांना ऑनलाईन माध्यमातून संबोधित केले.काल रात्री मी रुग्णालयात असलेल्या माझ्या आईच्या खोलीतल्या एका छोट्या सोफ्यावर झोपलो होतो. ज्याप्रमाणे कोणताही मुलगा आपल्या आईच्या प्रकृतीबद्दल चिंतीत असतो, अगदी त्याचप्रमाणे मलाही काळजी वाटत होती.रात्रभर मला केवळ एकाच गोष्टीचा दिलासा मिळाला. मला केरळच्या एका परिचारिकेकडून मोठा आधार वाटला; ती दर तासाला माझ्या आईची विचारपूस करण्यासाठी येत असे.

अगदी प्रत्येक तासाला ती तिथे यायची आणि आईची काळजी घ्यायची. ती हसायची आणि आईचा हात आपल्या हातात घ्यायची. केरळच्या या परिचारिकांनी कितीतरी मुलामुलींना, भावाबहिणींना त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण प्रसंगी दिलासा दिला असेल, याचा मी विचार करत होतो. पहाटेच्या वेळी मी तिला विचारलं "तू रात्री झोपतेस की रात्रभर कामच करत असतेस?" तिने उत्तर दिलं "मी रात्रभर कामच करते." याचा अर्थ असा की—जेव्हा संपूर्ण जग गाढ झोपेत असतं, तेव्हा केरळच्या या स्त्रिया—केवळ केरळमध्येच नव्हे, तर दिल्लीत, संपूर्ण देशभरात आणि अगदी जगभरातही— लोकांना दिलासा देण्याचे काम करत असतात. त्या लोकांचे हात आपल्या हातात घेऊन त्यांना दिलासा देतात आणि त्यांना निवांत व सुरक्षित असल्याची जाणीव करून देतात." अशा भावना राहुल गांधी यांनी व्यक्त केल्या.सर गंगा राम रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. अजय स्वरुप यांनी गुरुवारी सांगितले की, सोनिया गांधी यांना २४ मार्चच्या रात्री रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यांची प्रकृती आता स्थिर आहे. चिंतेचे कोणतेही गंभीर कारण नाही. मंगळवारी रात्री १०:२२ च्या सुमारास ताप आल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड



# 90 लाखांची मर्सिडीज कार ते दुसऱ्याच्या पैशांवर अनेक देश फिरला, खरातने व्यावसायिकाला काळी जादूच्या भीतीने कोट्यवधीने लुटलं

**नाशिक :** अशोक खरात याच्यावर आता आठवा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका बांधकाम व्यावसायिक असलेल्या तक्रारदाराने पोलिसांत आपली तक्रार नोंद केली आहे. त्यानुसार पोलिसांत आता भोंदू खरात याच्या विरोधात आठवा गुन्हा दाखल झाला आहे. बांधकाम व्यावसायिक असलेल्या एका इसमाला लॉजिस्टिक या व्यवसायाची परदेशात व्याप्ती वाढवायची होती. याच दरम्यान त्यांना त्यांच्या एका परिचयाच्या व्यक्तीकडून अशोक खरात उर्फ कॅप्टन याच्याबाबत माहिती मिळाली होती. त्यानुसार त्यांनी अशोक खरात याची नाशिकच्या ओकस प्रॉपर्टी अँड डेव्हलपर या कार्यालयात जाऊन भेट घेतली. यावेळी खरात याने त्यांना आपल्याकडे 'दैवी शक्ती' असल्याचे भासवून आणि त्यांचा व्यवसाय चांगल्या पद्धतीने सुरू करण्यासाठी त्याआधी 'अवतार पूजा' करावी लागेल असे सांगितले. अशोक खरात एवढ्यावरच थांबली नाही. त्याने व्यवसायिकाला मरणाची भीती घालून आपल्या जाळ्यात अडकवले. एवढेच नव्हे तर





या बाबाने पीडित इसमाकडून जवळपास 90 लाख रुपये किंमत असलेली एक मर्सिडीज कार देखील खरेदी करून घेतली होती. विशेष बाब म्हणजे दुसऱ्या जिल्ह्यातून खरेदी केलेली कार हा बाबा स्वतः चालवत नाशिक येथे घेऊन आला होता.अशोक खरात त्याने पुन्हा 'अवतार पूजेच्या' नावाखाली पीडित इसमाला गंडा घालने सुरूच ठेवले. अवतार पूजेवेळी खरात याने रात्रीच्या वेळी मंदिर परिसरात हात चलाखी करून एक खोटा साप दाखवला होता आणि परिसराची प्राप्ती करून घेण्यासाठी 21 देशांत भ्रमण करावे लागेल, येत्या 5 वर्षात तुला आणि मला 21 देशात घेऊन जाऊन तेथील मातीला स्पर्श करून त्या मातीची पूजा करावी लागेल. त्यानंतर तुझ्या व्यवसायाची भरभराट होऊन परिसराची प्राप्ती होईल, असे सांगण्यात आले होते. असे न केल्यास नागदेवतेचा कोप होऊन तुला नागदेवता तुला दंश करेन आणि तुझा मृत्यू होईल, अशी भीती घालण्यात आली.अशोक खरातने पीडित व्यवसायिकाला सांगितले की, पृथ्वीवरील ज्या देशात मी सांगेन त्या देशात तुला मला घेऊन जावे लागेल. मला दिलेले वचन जर तू पाळले नाही तर मी काळी जादू करून तुला मारून टाकेन, अशी भीती त्याने घातली. त्यानंतर २०१८ साली म्यानमार, २०१९ साली ग्रीनलँड येथे नेले. एवढेच नाही तर मानससरोवर हे स्वर्गाचे एक टोक मानले जाते तर ग्रीनलँड याला स्वर्गाचे दुसरे टोक मानले जात असल्याचे सांगून फर्चीवर झोपून मी आता स्वर्गात जाणार असून मला तसे संकेत मिळत असल्याचे सांगितले होते.त्यानंतर पुन्हा मारणाची भीती घालून पीडित इसमाकडून खरात याने नवीन वास्तूसाठी तुर्कस्थान येथील लाकडी आणि लोखंडी बांधकाम करून घेतले ज्यासाठी करोडो रुपये भोंदू खरात याने त्याच्या खात्यावर वळवून घेतले होते. त्याने आपली काळे कूकृत्य सुरू ठेवून खरात २०१९ ते २०२३ या कालावधीत युगांडा, इजिप्त, आयर्लंड, श्रीलंका, कंबोडिया, बांगलादेश येथे पूजा केली आणि या सर्व देशातील प्रवासाचा खर्च देखील खरात याने पीडित यांच्याकडून करून घेतला. अमेरिकेत देखील स्वतःवर लाखो रुपयांचा उपचार खरात याने पीडित व्यवसायिकाकडून करून घेतला होता.अखेर खरात याच्यावर संशय बळावल्याने पीडित व्यवसायिकाने त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवायला सुरुवात केली. त्यानंतर खरात हा भक्त येण्याआधी नकली साप आणून त्यावर काळ्या रंगाची पन्नी बांधून तो खरा साप असल्याचे भासवून लोकांकडून पैसे उकळत होता. त्यांनंतर पीडित व्यक्तीने खरात याच्याकडे काही वर्षांपासून केलेला खर्च आणि घेऊन दिलेली मर्सिडीज कार अशी सर्व रक्कम मागितली असता या भोंदूने पीडित व्यवसायिकावरच गुन्हा दाखल केला होता.

आता अशोक खरात याचा खरा चेहरा जागासमोर आल्यानंतर आणि खरात याच्यावर झालेली कारवाई समोर येताच पीडित व्यवसायिकाने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार आता खरात विरोधात आठवा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्या दिशेने देखील आता तपास सुरू केला जाणार आहे.

## आयुक्तालयात गोळीबार, आयुष्याची दोर कापली; ऑन-ड्युटी जवानाने स्वत:वरच झाडल्या गोळ्या

**अमरावती :** शहर पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या (QRT) शीघ्र कृती दलामधील एका जवानाने विजय दिलीप नागापुरे (वय ३५) यांनी आज गुरुवारी रोजी सकाळी अत्यंत धक्कादायक पाऊल उचलत आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण पोलीस विभागात खळबळ उडाली असून सहकाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, विजय नागापुरेहे मंगळवारी रात्री नाईट ड्युटीवर होते. ड्युटी पूर्ण केल्यानंतर काल बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास त्यांनी पोलीस आयुक्तालयातील QRT कार्यालयात स्वतःच्या शासकीय पिस्तुलातून डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, शाम घुगे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.या घटनेची माहिती सर्वप्रथम QRT मधील पोलीस कर्मचारी आकाश दिलीप अंबरते यांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविल्यानंतर संपूर्ण यंत्रणा हलली. घटनास्थळी फॉरेन्सिक



टीम व डॉग स्कॉडला पाचारण करण्यात आले असून तपासाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. घटनास्थळावरून पिस्तुलमधील बुलेट जप्त करण्यात आली आहे.मृतदेह पुढील तपासासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. विजय नागापुरे हे मूळचे मोर्शी तालुक्यातील धामणगाव काटपूर येथील रहिवासी होते. सध्या ते अमरावती शहरात कुटुंबासह राहत होते. ते २०१४च्या बॅचमध्ये पोलीस खात्यात रुजू झाले होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय असून त्यांचा भाऊ शाम नागापुरे हे देखील शहर पोलीस दलात कार्यरत आहेत. दरम्यान, आत्महत्येमागील नेमकं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नसून पोलीस विभागाकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

## आंदोलक दीपक बोऱ्हाडे यांनी रात्री उपोषण सोडलं!

**जालना :** धनगर आरक्षणासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर लढा उभारणारे धनगर समाजाचे आंदोलक व उपोषणकर्ते दीपक बोऱ्हाडे यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दीपक बोऱ्हाडे हे गेल्या काही दिवसांपासून मुंबईत उपोषणाला बसलेले असतानाच, जालना येथील बोऱ्हाडे यांच्या राहत्या घरी त्यांचे सासरे रामराव दामू होळकर यांनी गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. त्यानंतर रात्री सरकारच्या शिष्टमंडळाने भेट घेतल्याने दीपक बोऱ्हाडे यांनी धनगर आरक्षणासाठी सुरू असलेले आपले उपोषण स्थगित केले.मिळालेल्या माहितीनुसार, 78 वर्षीय रामराव होळकर यांनी बुधवारी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेतला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. एकीकडे दीपक बोऱ्हाडे समाजाच्या हक्कासाठी आझाद मैदानावर उपोषण करत असताना दुसरीकडे त्यांच्याच घरात सासऱ्यांनी मृत्यूला कवटाळल्याने हळहळ व्यक्त होत आहे.रामराव होळकर हे दुपारच्या सुमारास टीव्ही पाहत बसले होते. तेव्हा अचानक रामराव यांनी मुख्य रूमचा दरवाजा आतून लॉक करत गळफास घेऊन जीवन संपवलं.

## संशयाच्या जाळ्यात अडकलं पती पत्नीचं नातं; पुण्यात 23 वर्षीय महिलेला पतीकडून मारहाण

**पुणे :** संशयाचं भूत कोणत्या टोकापर्यंत जाऊ शकतं याचं प्रत्यक्ष उदाहरण पुण्यामध्ये घडलंय. चरित्र्यावरील संशयावरून पतीने आपल्या पत्नीला एवढी जबर मारहाण केली की पत्नीला तिचा जीव गमवावा लागला आहे. ही धक्कादायक घटना घडली आहे शहरातील अप्पर इंदिरानगर परिसरात. २४ मार्च रोजी दुपारी चारच्या सुमारास घडलेली घटना ऐकून पुणेकर हादरले आहेत. पतीने चारित्र्यावर संशय घेत आपल्या पत्नीला मारहाण केली, ज्यात पत्नी गंभीर जखमी झाली आणि उपचार सुरु असताना गुरुवारी पहाटे तिचा मृत्यू झाला आहे. घटनेत ठार झालेली २३ वर्षीय सारीका शुभम घोडके ही महिलेची ओळख आहे. आरोपी पती, २९ वर्षीय शुभम श्रीकांत घोडके, हा पानटपरी चालवतो. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून, खुनाचा प्रयत्न आणि खुनाचे कलम दोन्ही गुन्हे दाखल केले आहेत.सारिकाची आई, ५० वर्षीय गेणीबाई रुपसिंग चव्हाण यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. त्यांनी सांगितले की, शुभम नेहमीच सारिकाच्या चारित्र्यावर संशय करत असे आणि घरात तिला मानसिक आणि शारीरिक त्रास देत होता. २४ मार्च रोजी तो घरी आला आणि तीक्ष्ण हत्याराने तिच्या डोक्यात, हातावर आणि पायावर वार करून गंभीर जखमी केले. शेजाऱ्यांच्या मदतीने तिला तातडीने रुग्णालयात नेले, परंतु उपचार दरम्यान तिचा मृत्यू झाला.या प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते तपास करत आहेत. त्यांनी घटनास्थळी साक्षीदारांची छाननी सुरु केली असून, आरोपीच्या मानसिक स्थितीबाबत आणि घटना घडण्याच्या परिस्थितीबाबत सखोल तपास सुरु आहे. सारिका आणि शुभम यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहेत. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून शेजारी हादरले आहेत. महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित होतं आहे. या घटनेमुळे कौटुंबिक हिंसेवर आणि वैवाहिक संशयावर शहरात चर्चा रंगली आहे. घरातील वाद आणि संशयावर संयम ठेवणे किती आवश्यक आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

स्थानिक रहिवाशांनी महिलांच्या सुरक्षेसाठी जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. सामाजिक दृष्टिकोनातूनही हा प्रकार धडा देणारा आहे.

## अवैध नंबरच्या ट्रॅक्टरमधून रेती तस्करी; भरधाव वेगाने तरुणाचा जीव गेला

**चंद्रपूर :** शासकीय कामांसाठी मुबलक प्रमाणात रेती उपलब्ध होत असताना, घरकुलाच्या बांधकामासाठी मात्र सर्वसामान्यांना रेती मिळवताना मोठा संघर्ष करावा लागत आहे. याच टंचाईचा फायदा आता रेती तस्करांनी उचलला असून, रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टरचा भीषण अपघात झाला आहे. या घटनेत एका २४ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून, दुसरा गंभीर जखमी झाला आहे. ही घटना जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील फुरडीहेटी–वढोली मार्गावर आज (बुधवारी) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडली. संतोष मडावी असे मृताचे नाव असून, साहिल कोवे हा गंभीर जखमी आहे.गोंडपिपरी तालुक्यातून मोठ्या प्रमाणात रेतीची तस्करी केली जाते, परंतु याकडे महसूल विभागाचे कायमचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप



होत आहे. एकीकडे सरकारी कामांसाठी रेतीची कमतरता नसताना, घरकुल लाभार्थ्यांना मात्र अवैध रेती तस्करांवर अवलंबून राहावे लागत आहे. याच तस्करीमुळे आज एका निष्पाप तरुणाला आपला जीव गमवावा लागला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोंडपिपरी तालुक्यातील कुलथा रेती घाटावरून चेक बोरगाव येथील घरकुल लाभार्थ्यासाठी रेती घेऊन एक विना क्रमांकाचा ट्रॅक्टर निघाला होता. महसूल आणि पोलीस विभागाच्या कारवाईपासून वाचण्यासाठी चालक ट्रॅक्टर भरधाव वेगाने चालवत होता. दरम्यान, फुरडीहेटी–वढोली मार्गावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर रस्त्याच्या खाली उलटला. ट्रॉलीवर संतोष सुंदरशहा मडावी (वय २४) व साहिल कोवे हे दोघे बसले होते. हा अपघात इतका भीषण होता की, संतोषचा जागीच मृत्यू झाला, तर साहिल गंभीर जखमी झाला.घटनेची माहिती मिळताच गोंडपिपरी पोलीस ठाण्याचे ठाणेदार रमेश हत्तीगोटे आपल्या पथकासह तातडीने घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी पाठवला आहे. या प्रकरणी ट्रॅक्टर चालक आकाश गोरकर याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, पुढील तपास गोंडपिपरी पोलीस करत आहेत. मृत संतोषच्या पश्चात आई-वडील आणि पाच भाऊ असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या तरुणाचा अकाली मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. या व्यवहारासाठी वापरण्यात आलेल्या 'टीपी'वर (Transport Permit) जो ट्रॅक्टर क्रमांक नमूद करण्यात आला होता, तो चुकीचा होता. संबंधित क्रमांकाचा ट्रॅक्टर एका फायनान्स कंपनीने यापूर्वीच जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्यक्षात ज्या ट्रॅक्टरने रेतीची वाहतूक केली जात होती, त्यावर कोणताही क्रमांक नव्हता. यामुळे या तस्करीचे रॅकेट किती खोलवर पसरले आहे, हे स्पष्ट होत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मला बूट साफ करायला लावले, माजी क्रिकेटरने टीमवर केला वर्णभेदाचा आरोप, ड्रेसिंग रूममधील प्रसंग सांगितला

**मुंबई/वृत्तसंस्था :** भारताचे माजी खेळाडू लक्ष्मण शिवरामकृष्णन यांनी खुलासा केला आहे की, त्यांना त्यांच्या रंगावरून कसे टोमणे ऐकावे लागले, ज्यामुळे ते नैराश्यातही गेले होते. आपल्या काळातील सर्वोत्कृष्ट गोलंदाजांपैकी एक असलेले आणि 1983 ते 1987 दरम्यान भारतासाठी नऊ कसोटी आणि 16 एकदिवसीय सामने खेळलेल्या शिवरामकृष्णन यांनी सांगितले की, त्यांच्या रंगावरून होणारे टोमणे इतके तणावपूर्ण होते की त्यांना आरशात स्वतःकडे पाहण्याचीही इच्छा होत नव्हती. ते काहीही सहन करू शकत नव्हते. प्रत्येक वेळी सकाळी उठल्यावर त्यांना वाटायचे की आता आपला मृत्यू होणार आहे.इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, शिवरामकृष्णन यांनी त्यांच्या रंगावरून झालेल्या टोमण्यांबद्दल काही किस्सेही सांगितले. त्यांच्या 17 व्या



वाढदिवशी, भारतीय संघासोबत पाकिस्तान दौऱ्यावर असताना, शिवरामकृष्णन यांना सुनील गावस्कर यांनी मागवलेला केक कापण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. एका सहकारी खेळाडूने तो केक पाहिला आणि म्हणाला, "हे सनी, तू अगदी योग्य रंगाचा केक मागवला आहेस! एका सावळ्या मुलासाठी डार्क चॉकलेट केक. एका सहकारी खेळाडूने केलेला हा टोमणा ऐकून ते रडू लागले आणि त्यांनी केक कापण्यास नकार दिला. सुनील गावस्कर यांना त्यांना शांत करावे लागले आणि त्यानंतर त्यांनी डोळ्यात अश्रू आणून केक कापला.मात्र, ही त्यांची पहिली वेळ नव्हती. वयाच्या 14 व्या वर्षी, एका वरिष्ठ भारतीय फलंदाजाने त्यांना चेपॉकमध्ये मैदान कर्मचारी समजून आपले बूट साफ करायला सांगितले होते. तामिळनाडूच्या ड्रेसिंग रूममध्ये, वरिष्ठ खेळाडू त्यांना 'करुप्पा' म्हणत असत. जेव्हा ते उत्तर भारतात सीमारेषेवर क्षेत्ररक्षण करत असत, तेव्हा प्रेक्षक 'कालिया' अशी घोषणा देत असत.शिवररामकृष्णन यांनी सांगितले की, मुंबईतील एका हॉटेलच्या गेटकीपरने एकदा त्यांना पुन्हा आत जाण्यापासून रोखले होते. ते भारतीय संघाचा भाग असूनही, गेटकीपरने त्यांचा रंग आणि वय पाहून ते कधीही भारतीय क्रिकेटपटू होऊ शकत नाहीत असे जाहीर केले. त्यांची ओळख पटवण्यासाठी एका सहकारी खेळाडूची त्यांना एक तास वाट पाहावी

लागली. शिवरामकृष्णन यांनी स्पष्ट केले की, या सगळ्यामुळे त्यांची एक व्यक्ती म्हणून असलेली आत्म-प्रतिष्ठा पार ढासळली होती. इतक्या लहान वयात जेव्हा आत्म-प्रतिष्ठा इतकी कमी असते, तेव्हा आत्मविश्वास निर्माण करणे तर सोडाच, पण आत्मविश्वास निर्माण करणेही खूप कठीण असते. मला नेहमी हे सर्व विसरून जायचे होते. पण ते विचार त्यांच्या मनात खोलवर रुजलेले राहत आणि अखेरीस पुन्हा वर येत. मी पूर्णपणे खचलो होतो. थोडे मद्यपान करून झोपून जात, कारण मी काहीही सहन करू शकत नव्हतो."

## बुमराहच्या फिटनेसची चिंता मिटली

**मुंबई/वृत्तसंस्था :** गेल्या आयपीएल टी-२० मोसमात पाठदुखीमुळे जसप्रीत बुमराह चार सामन्यांना मुकला होता. यंदाही बेंगळुरूतील बीसीसीआयच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'ला भेट दिल्यानंतर बुमराहच्या फिटनेसबाबत चर्चांना सुरुवात झाली. मात्र अशी चिंता करण्याचे कोणतेही कारण नसल्याचे संघाशी संबंधित सूत्रांनी सांगितले आहे. यामुळे कर्णधार हार्दिक पंड्या आणि मुंबई इंडियन्स संघ व्यवस्थापनाचा जीव भांड्यात पडला आहे. बुमराहच्या फिटनेसबद्दल कुठलंही काळजी करण्याचं कारण



नसल्याचं समजताच चाहतेही काहीसे निर्धास्त झाले आहेत.बुमराह 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये दाखल झाल्यामुळे चर्चेला तोंड फुटले होते. तो कधी जायबंदी झाला? असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला होता. मात्र बुमराहच्या बेंगळुरूवारीचे कारण वेगळेच आहे. 'ईएसपीएन क्रिकइन्फो' या वेबसाइटने दिलेल्या माहितीनुसार कार्यभाराचे नियोजन (वर्कलोड मॅनेजमेंट) या मुद्यावरील चर्चेसाठी बुमराह बेंगळुरूतील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये दाखल झाला आहे.बीसीसीआयच्या वार्षिक करारातील खेळाडूंना आयपीएलच्या सुरुवातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'ला भेट द्यावी लागते, तसा नियमच आहे. तिथे त्यांच्या फिटनेसचा आढावा घेतला होता. त्यात उत्तीर्ण झालेले खेळाडूच आपापल्या आयपीएल संघात भाग घेऊ शकतात. यामुळेच बुमराहला मुंबई इंडियन्समध्ये दाखल होण्यास विलंब होत आहे.बेंगळुरूतील वास्तव्यादरम्यान बुमराह ताकद आणि फिटनेसवर मेहनत घेत असल्याचेही सूत्रांनी सांगितले आहे. नुकत्याच पार पडलेल्या वर्ल्ड कपमध्ये बुमराहने ठसा उमटवला होता. पुढील महत्त्वाच्या स्पर्धांच्या दृष्टीने बुमराहची भूमिका बीसीसीआय सहाजिकच जाणून आहे. त्या संदर्भातील नियोजनही बुमराहसोबत करण्यात आले आहे. बुमराह बेंगळुरूतील केंद्रात गोलंदाजीचा सराव करत आहे. तो लवकर मुंबई इंडियन्सच्या गोटात सहभागी होणार आहे.२०२७ च्या वर्ल्ड कप वनडे स्पर्धेनुसार बुमराहच्या नियोजनाला सुरुवात या अनुभवी गोलंदाजाचा फिटनेस, पुरेशी विश्रांती, कार्यभाराचे नियोजन या गोष्टींबद्दल बीसीसीआय काटेकोर २०२३ च्या वर्ल्ड कप वनडे फायनलनंतर बुमराह वनडे क्रिकेटपासून दूर जुलैमध्ये रंगणारी इंग्लंडविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिका बुमराहसाठी महत्त्वाच्या ठरतील

## IPL शी तुलना करतात; पीएसएलमध्ये चालू सामन्यात चक्क चेंडूचा रंग बदलला; पांढरा बॉल गुलाबी झाला..

**मुंबई/वृत्तसंस्था :** लाहोर कलंदर्स आणि हैदराबाद किंग्समेन यांच्यातील पाकिस्तान सुपर लीग सामन्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला मोठी नामुष्की पत्करावी लागली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची मोठ्या प्रमाणावर खिल्ली उडवली जात आहे. लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमवर हैदराबाद किंग्समेन संघ क्षेत्ररक्षण करत असताना, सामन्याचा चेंडू अचानक पांढऱ्या रंगावरून गुलाबी झाला. पण चालू सामन्यात हा भयंकर प्रकार घडल्यामुळे पाकिस्तानची आता लाज निघाली आहे. हैदराबाद किंग्समेन संघ पाकिस्तान सुपर लीगमध्ये एक नवीन संघ आहे आणि त्यांनी आपल्या खेळाडूंना दिलेल्या जर्सी बहुधा निकृष्ट दर्जाच्या होत्या, ज्यामुळे चेंडूवर रंग उतरू लागला. जेव्हा किंग्समेनचे गोलंदाज चेंडूला चमकवण्यासाठी जर्सीवर घासत होते, तेव्हा त्याचा रंग फिका पडू लागला. चेंडू तात्काळ गुलाबी झाला. ही छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल झाली आहेत, ज्यामुळे संघ आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची मोठ्या प्रमाणावर खिल्ली उडवली जात आहे. पाकिस्तानमध्ये निकृष्ट दर्जाच्या जर्सी वापरल्या जाण्याचे हे




केवळ एक प्रकरण नाही. यापूर्वीही पाकिस्तान संघाच्या जर्सीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहे. खेळपट्टीचा दर्जा इतका खराब आहे की खेळाडूंना प्रचंड घाम येतो.पीएसएल 2026 च्या पहिल्या सामन्यात, लाहौल कलंदर्सने प्रथम फलंदाजी करत 20 षटकांत 199 धावा केल्या. सलामीवीर फखर जमानने 39 चेंडूंमध्ये 53 धावा करून या हंगामातील आपले पहिले अर्धशतक झळकावले. मोहम्मद नईमने 19 चेंडूंमध्ये 30 धावा केल्या. मधल्या फळीत खेळणाऱ्या यष्टीरक्षक हसीबुल्लाह खानने 28 चेंडूंमध्ये 40 धावा केल्या. सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझाने 10 चेंडूंमध्ये 24 धावा करून संघाला 199 धावांपर्यंत पोहोचवले.कर्णधार शाहीन आफ्रिदीने दोन चेंडूंमध्ये दोन षटकार मारले. हैदराबाद किंग्समेनकडून रायली मेरेडिथ आणि हसन खान यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. मोहम्मद अलीने एक बळी घेतला, पण तीन षटकांत 50 धावा दिल्या.

# टीम इंडियाचे वर्षभराचे दौरे ठरले, BCCI कडून वेळापत्रक जारी..

**मुंबई/वृत्तसंस्था :** पुढील वर्षी एकदिवसीय विश्वचषक खेळला जाईल. त्याआधी, सर्वांचे लक्ष भारतीय क्रिकेट संघावर आहे. टीम इंडिया पुढील वर्षीच्या विश्वचषकासाठी आधीच तयारी करत आहे. पुढील विश्वचषक विशेषतः विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. आतापासून ते पुढील वर्षीच्या विश्वचषकापर्यंत टीम इंडिया किती एकदिवसीय सामने खेळणार आहे, हे जाहीर झाले आहे. बीसीसीआयने संपूर्ण वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. नंतर अतिरिक्त एकदिवसीय सामने जोडले गेल्यास, ती एक वेगळी बाब असेल.

विराट कोहली And रोहित शर्मा आता फक्त एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने खेळत आहेत, त्यामुळे एकदिवसीय सामना नेहमीच रोमांचक असतो. भारतीय संघाचे खेळाडू




सध्या आयपीएलमध्ये व्यस्त असतील, जी सुमारे दोन महिने चालेल, परंतु त्यानंतर जेव्हा आंतरराष्ट्रीय सामने पुन्हा सुरू होतील, तेव्हा आपण काही उत्कृष्ट सामन्यांची अपेक्षा करू शकतो. टीम इंडिया आतापासून ते 2027 च्या विश्वचषकापर्यंत 20 एकदिवसीय सामने खेळणार आहे.एकदिवसीय मालिका अफगाणिस्तानविरुद्धच्या मालिकेने सुरू होईल. अफगाणिस्तानचा संघ भारताचा दौरा करणार आहे. प्रथम एक कसोटी सामना खेळला जाईल, त्यानंतर तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका होईल. कसोटी सामना 6 जून रोजी सुरू होईल आणि एकदिवसीय मालिका 14 जून रोजी सुरू होईल. आयपीएलनंतर टीम इंडियाची ही पहिली मालिका असेल. ही मालिका 20 जून रोजी सुरू होईल. यानंतर भारतीय संघ इंग्लंडचा दौरा करेल, जिथे तीन एकदिवसीय सामने नियोजित आहेत. टीम इंडिया मायदेशात वेस्ट इंडिजविरुद्ध तीन एकदिवसीय सामने खेळेल. भारतीय क्रिकेट संघ न्यूझीलंड दौऱ्यावर पाच एकदिवसीय सामने खेळणार आहे. यासाठी भारतीय संघ न्यूझीलंडचा दौरा करेल. तसेच श्रीलंका आणि झिम्बाब्वेविरुद्ध प्रत्येकी तीन एकदिवसीय सामने भारतात खेळले जातील. पुढील वर्षीच्या विश्वचषकापूर्वी टीम इंडियाचे हे एकदिवसीय वेळापत्रक आहे.


कधीकधी मध्येच एक मालिका जोडली जाते, जे यावेळीही होऊ शकते. पण जरी फक्त हेच सामने खेळले गेले तरी, विश्वचषकापूर्वी अजून बरेच सामने बाकी असतील. विश्वचषकापर्यंत आपला फॉर्म टिकवून ठेवण्यासाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांना भरपूर धावा करायच्या असतील. सर्वांचे लक्ष त्यांच्या कामगिरीवर असेल, कारण यावरूनच हे ठरेल की दोन्ही खेळाडू विश्वचषकापर्यंत खेळू शकतील की त्यांना संघ सोडावा लागेल. एकंदरीत, येत्या काळात त्यांच्यासाठी एकदिवसीय सामन्यांचा प्रचंड थरार अनुभवायला मिळणार आहे.


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अप्सरा’ बनली ‘मंजुळा’; ‘सालबर्डी’त सोनाली कुलकर्णीचा धमाकेदार आयटम साँग

आपल्या दिलखेचक अदांनी भुरळ घालणारी ‘अप्सरा’ अर्थात अभिनेत्री सोनाली कुलकर्णी नव्या अंदाजात चाहत्यांच्या भेटीला येण्यास सज्ज झाली आहे. येत्या 17 एप्रिलला प्रदर्शित होणाऱ्या ‘सालबर्डी’ या चित्रपटातील ‘मंजुळा’ या धमाकेदार गाण्यातून सोनालीचा मनमोहक आणि हटके अंदाज पहायला मिळणार आहे. ‘मंजुळा’ या आयटम साँगची कोरिओग्राफी तितकीच आकर्षक असून, याची कोरिओग्राफी फुलवा खामकर यांनी केली आहे. गुरु ठाकूर यांनी लिहिलेलं, संगीतकार पद्मनाभ गायकवाड यांचे संगीत असलेलं, हे गाणं आनंदी जोशी हिने गायलं आहे.‘सालबर्डी’ या चित्रपटाची निर्मिती अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांनी केली असून आजवर गुल्हर, बाबो, पाणीपुरी यासारखे वेगळ्या धाटणीचे चित्रपट दिल्यानंतर दिग्दर्शक रमेश साहेबराव चौधरी यांनी ‘सालबर्डी’ हा मल्टीस्टारर रहस्यमय थरारपट रसिकांसाठी आणला आहे. ‘मंजुळा’ या नव्या गाण्याबद्दल बोलताना सोनाली म्हणाली, “हे गाणं माझ्यासाठी खूप खास





आहे. या गाण्यात एक वेगळीच एनर्जी आहे. फुलवाने सुद्धा या गाण्यातून काहीतरी नवीन आणि एंटरटेनिंग देण्याचा प्रयत्न केला असून ते प्रेक्षकांच्या नक्कीच पसंतीस पडेल. सोनालीच्या या नव्या गाण्यामुळे ‘सालबर्डी’ चित्रपटाबद्दलची उत्सुकता अजूनच वाढली आहे.महाराष्ट्रातील दुर्गम भागात वसलेल्या ‘सालबर्डी’ या गावात घडणाऱ्या रहस्यमय, भयावह आणि अस्वस्थ करणाऱ्या घटनांचा थरारक शोध घेणारा ‘सालबर्डी’ चित्रपट नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारण्यात आला आहे. भय आणि भ्रमाच्या विळख्यातल्या अनपेक्षित घटनेमागच्या शोधाचे ‘रहस्य’ शोधताना काय होणार? हे सत्य कोण आणि कसं बाहेर काढणार? हे पाहणं अतिशय थरारक असणार आहे. या चित्रपटात पूजा सावंत, शशांक शेंडे, ओंकार भोजने, भारत गणेशपुरे, अंशुमन विचारे, रोहित कोकाटे, कमलाकर सातपुते, चित्तरंजन गिरी, अनिल नगरकर, माधव अभ्यंकर, प्रवीण डाळिंबकर, अभय गिते, राजेंद्र सातार्डेकर, कोमल चौधरी आदि कलाकारांच्या भूमिका आहेत. आकर्षक कोरिओग्राफी, भन्नाट स्टेप्स आणि झिंग आणणारी सोनालीची एनर्जी यामुळे ही ‘मंजुळा’ प्रेक्षकांसाठी व्हिज्युअल ट्रीट ठरणार आहे.

## अमृता सिंहसोबतच्या अफेअरच्या चर्चांवर सनी देओलचं रोखठोक उत्तर

अभिनेता सनी देओलला बॉलिवूडचा ‘एंग्री मॅन’ म्हटलं जातं. सर्वांत ‘रफ अँड टफ’ दिसणारा सनी खऱ्या आयुष्यात अत्यंत स्पष्टवक्ता आहे. जे मनात आहे, तेच त्यांच्या मुखात असतं आणि त्याचा हाच बिनधास्त अंदाज चाहत्यांना सर्वाधिक आवडतो. सनी देओल अनेकदा त्याच्या खासगी आयुष्यामुळेही चर्चेत आला आहे. करिअरच्या सुरुवातीच्या काळात त्याचं नाव अभिनेत्री अमृता सिंहशी अनेकदा जोडलं गेलं होतं. या दोघांनी 1983 मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘बेताब’ या चित्रपटात एकत्र काम केलं होतं. हा सनी देओलचा पदार्पणातील चित्रपट होता. त्यानंतर 1984 मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘सनी’ या चित्रपटातही दोघं ऑनस्क्रीन रोमान्स करताना दिसले. या दोघांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री इतकी जबरदस्त होती की ऑफस्क्रीनसुद्धा त्यांच्या अफवांच्या चर्चांना उधाण आलं होतं. त्याकाळी सनी आणि अमृताच्या अफेअरची चर्चा हा अनेक मॅगझिन्सचा मुख्य विषय असायचा.अमृतासोबतच्या अफेअरच्या चर्चा होत असतानाच सनी देओलने पूजा देओलशी साखरपुडा केला होता. अशातच एका मुलाखतीत त्याला प्रश्न विचारण्यात आला होता की, या अफेअरच्या चर्चांचा पूजावर काही परिणाम होतो का? त्यावर सनी देओलने






जे उत्तर दिलं होतं, त्याची आजही चर्चा होते. मुलाखतीत सनी देओल म्हणाला होता, “मी सिनेसृष्टीत येण्यापूर्वीच पाहिलं होतं की लोक काय लिहितात आणि काय म्हणतात? हे सर्व सहन करावं लागतं, ऐकावं लागतं. कधीकधी खूप राग येतो, जेव्हा बरंच काही उलटसुलट लिहिलं जातं. मग अशा वेळी कोणी भेटलं तर त्याला पकडायचं आणि मारायचं. अजून काय करणार? (हसतो).”सनी देओलने 1984 मध्ये पूजाशी लग्न केलं होतं. पूजा नेहमीच लाइमलाइटपासून दूर राहणं पसंत करते. हिंदी सिनेसृष्टीतील सर्वांत चर्चेतल्या अभिनेत्याची पत्नी असूनही पूजा साधेपणानं जगते. या दोघांना करण आणि राजवीर ही दोन मुल आहेत. या दोघांनीही वडिलांच्या पावलांवर पाऊल टाकत अभिनयक्षेत्रात पदार्पण केलं आहे. करणने ‘पल पल दिल के पास’ या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं, तर राजवीरने ‘दोनों’ या चित्रपटातून सिनेसृष्टीत एण्ट्री केली.

## त्या काळात शिल्पा शेट्टी म्हणजे मुव्ही सुपरहिट

90 च्या दशकात अक्षय कुमार आणि शिल्पा शेट्टी ही जोडी अशीच सुपरहिट ठरली होती. दमदार डान्स आणि उत्कृष्ट अभिनयामुळे त्यांनी एकापेक्षा एक हिट चित्रपट दिले.मात्र, 2000 साली प्रदर्शित झालेल्या ‘धडकन’ या चित्रपटाने या जोडीच्या यशासोबतच त्यांच्या डान्सला पूर्णविराम दिला. या चित्रपटातील ‘तुम दिल की धडकन में’ आणि ‘दुल्हे का सेहरा’ यांसारखी गाणीही प्रचंड गाजली.चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला पण पडद्यामागे वेगळीच कहाणी घडत होती. चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान अक्षय आणि शिल्पा यांच्या वैयक्तिक नात्यात तणाव निर्माण झाला. या मतभेदांचा परिणाम त्यांच्या करिअरवरही झाला आणि ही सुपरहिट जोडी कायमची तुटली.या आधी ‘मैं खिलाड़ी तू अनाड़ी’, ‘तू चोर मैं सिपाही’ आणि ‘इंसाफ’ यांसारख्या चित्रपटांतून त्यांनी सलग हिट चित्रपट दिले. ‘चुरा के दिल मेरा’ हे गाणं आजही लोकप्रिय आहे. त्यामुळे निर्मात्यांनी या जोडीवर आधारित अनेक मोठे प्रोजेक्ट्स तयार केले होते पण त्यांच्या विभक्त होण्यामुळे हे सर्व प्रोजेक्ट्स थांबले.यानंतर अक्षय कुमारने कैटरीना कैफ आणि प्रियंका चोप्रासोबत काम केलं. मात्र, अक्षय-शिल्पाच्या जोडी जेवढी प्रसिद्ध होती तेवढी ही जोडी ठरली नाही. वैयक्तिक आयुष्यातही मोठे बदल झाले.

## 10 वर्षे अबोला, अभिनेत्री म्हणाली, 'श्रीदेवींच्या मृत्यूनंतर त्याला साक्षात्कार झाला अन्..

सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी नं अनेक गाजलेल्या मराठी सिनेमांमध्ये काम केलं आहे. अभिनेत्रीसोबतच सोनाली उत्तम नृत्यांगनासुद्धा आहे. सोनालीचं 'अप्सरा आली' हे गाणं आजही प्रेक्षकांच्या ओठांवर असतं. सुंदर अभिनयाच्या जोरावर सोनालीनं मोठा चाहतावर्ग निर्माण केला आहे. अशातच आता सोनाली एका मुलाखतीमुळे चर्चेत आहे. तुम्हाला माहितीये का? सिद्धार्थ जाधव आणि सोनाली कुलकर्णी १० वर्ष एकमेकांशी बोलत नव्हते. याबद्दल अभिनेत्रीनं मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. सोनाली कुलकर्णीनं नुकतीच 'व्हायफळ' या पॉडकास्टला मुलाखत दिली. यादरम्यान सिद्धार्थ जाधवसोबतच्या अबोल्याचं कारण सांगताना अभिनेत्री म्हणाली की, 'मी श्रीदेवी यांची मोठी फॅन आहे. जेव्हा त्यांचं निधन झालं तेव्हा माझा एक अत्यंत जवळचा मित्र आणि मी पुन्हा बोलायला लागलो.म्हणजे ही गोष्ट आता खूप लोकांना माहीत आहे. कारण, आम्ही बऱ्याच प्लॅटफॉर्म आणि इव्हेंट्समध्ये बोललो आहोत. सिद्धार्थ जाधव हा माझा पहिला सहकलाकार मित्र आहे. त्यानं एका शूटिंगदरम्यान फालतू कारणामुळे माझ्याशी बोलणं सोडलं होतं. ते त्यानं दहा वर्ष जपलं. तो अबोला त्यानं दहा वर्ष टिकवला.'त्यावेळी




श्रीदेवींचं अचानक निधन झालं. त्यानंतर त्याला साक्षात्कार झाला की, असं कदाचित आमच्या बाबतीत घडलं तर? आम्हाला एकमेकांशी बोलण्याची संधीच मिळणार नाही. मग त्यानं अनेक वर्षांनी मला फोन केला आणि म्हणाला, 'जाऊ दे. आपण सगळं विसरूया.' त्यानंतर मग आमची मैत्री आणखी घट्ट झाली. आयुष्य हे खूप लहान आहे, याची जाणीव होण्यासाठी आपण कोणतरी जायची वाट बघू नये.' असं सोनालीनं पुढे सांगितलं.दरम्यान, सोनाली कुलकर्णीच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं, 'गाढवाचं लग्न', 'क्षणभर विश्रांती', 'मितवा', 'पोश्टर गर्ल', 'नटरंग', 'हिरकणी' यांसारख्या गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलं आहे. तसंच सोनाली नुकतीच 'तिघी' या सिनेमामध्येही झळकलेली. या सिनेमाला प्रेक्षकांचं भरघोस प्रेम मिळालं असून यामध्ये सोनालीसोबत भारती आचरेकर आणि नेहा पेंडसे यांच्याही मुख्य भूमिका होत्या.

## ‘धुरंधर 2’ची छप्परफाड कमाई; मग या चित्रपटाकडे प्रेक्षकांनी का फिरवली पाठ?

आदित्य धर दिग्दर्शित ‘धुरंधर 2’ या चित्रपटावर काहींनी प्रोपेगेंडाचा आरोप केला. तरीसुद्धा या चित्रपटाच्या दोन्ही भागांनी बॉक्स ऑफिसवर छप्परफाड कमाई केली. ‘धुरंधर : द रिव्हेंज’ हा चित्रपट 19 मार्च रोजी जगभरातील थिएटर्समध्ये प्रदर्शित झाला असून आतापर्यंत रणवीर सिंहच्या या चित्रपटाने 900 कोटी रुपयांहून अधिक कमाई केली आहे. प्रोपेगेंडाचा आरोप झालेला असाच एक चित्रपट फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. परंतु या चित्रपटाला प्रेक्षकांकडून अपेक्षित असा प्रतिसाद मिळाला नाही. आता ‘धुरंधर 2’च्या लाटेचा या चित्रपटाला चांगलाच फटका बसला आहे. या चित्रपटावरून बराच वाद झाला



होता आणि हा वाद कोर्टापर्यंतही पोहोचला होता. या चित्रपटाचं नाव आहे ‘द केरळ स्टोरी 2: गोज बियाँड’.उल्का गुप्ता, ऐश्वर्या ओझा आणि अदिती भाटिया या तिघींची मुख्य भूमिका असलेल्या ‘द केरळ स्टोरी 2’ या चित्रपटाने प्रदर्शनाच्या चौथ्या आठवड्यात फक्त 60 लाख रुपयांची कमाई केली. ‘धुरंधर 2’च्या लाटेत हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर टिकू शकला नाही. कामाख्या नारायण सिंह दिग्दर्शित या चित्रपटाने आतापर्यंत फक्त 42.10 कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाचा प्रवास इथेच संपुष्टात येईल, कारण थिएटरमध्ये ‘धुरंधर 2’चा प्रचंड दबदबा आहे. जर रणवीर सिंहचा हा चित्रपट इतक्यात प्रदर्शित झाला नसता तर कदाचित ‘द केरळ स्टोरी 2’ने बॉक्स ऑफिसवर 50 कोटी रुपये कमावले असते. या चित्रपटाचा बजेट 28 ते 30 कोटी रुपये असल्याने त्या तुलनेत चित्रपटाने बरी कमाई केली आहे.‘द केरळ स्टोरी’च्या पहिल्या भागाच्या तुलनेत दुसऱ्या भागाला प्रेक्षकांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. पहिल्या भागाने 6.75 कोटी रुपयांनी ओपनिंग केली होती आणि जगभरात या चित्रपटाने 220 कोटी रुपये कमावले होते. ‘द केरळ स्टोरी 2’ हा चित्रपट 27 फेब्रुवारी रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. हा चित्रपट प्रचारकी आणि समाजात द्वेष पसरवणारा असल्याची टीका त्यावर झाली होती. 2023 मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘द केरळ स्टोरी’चा हा सीक्वेल आहे. धर्मांतराच्या नावाखाली तरुणींची केली जाणारी फसवणूक हा गंभीर मुद्दा यात अधोरेखित करण्यात आला आहे. ‘द केरळ स्टोरी’वरही काही राज्यांमध्ये बंदी घालण्यात आली होती. तर काहींनी हा चित्रपट प्रचारकी असल्याचं म्हटलं होतं.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो क्रीडा स्पर्धेचा समारोप थाटात संपन्न....

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तेंग सु-डो स्पोर्टस असोसिएशन, नांदुरा यांच्या सहकार्याने आयोजित राज्यस्तरीय शालेय तेंग सु-डो क्रीडा स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. दि. २४ ते २५ मार्च दरम्यान छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, नगर परिषद, नांदुरा येथे १४, १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातील विविध विभागांतून ४८ मुलगे व ४८ मुलींचे संघ, व्यवस्थापक, पंचाधिकारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी तेंग सु-डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष रॉकी डिसोजा, प्रमुख अतिथी म्हणून सुभाष मोहीते, अनिल अंबुसकर, विजय अंबुसकर, पुरुषोत्तम निळे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस महानकर यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व खेळाडू, प्रशिक्षक व पंचांचे कौतुक केले. पराभूत खेळाडूंनी सातत्याने सराव करून पुढील स्पर्धांमध्ये यश मिळवावे, असे आवाहन करत विजेत्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षीय भाषणात रॉकी डिसोजा यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. स्पर्धेत सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले, तर प्राविण्य प्राप्त खेळाडूंना प्रमाणपत्रे व पदके मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. ऑल ओव्हर गुणांकनात मुंबई विभाग प्रथम, अमरावती विभाग द्वितीय, पुणे विभाग तृतीय व लातूर विभाग चतुर्थ क्रमांकावर राहिले. विजेत्या संघांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल अंबुसकर यांनी तर विजय अंबुसकर यांनी आभार प्रदर्शन केले. या स्पर्धेच्या यशस्वी




आयोजनासाठी क्रीडा अधिकारी, मार्गदर्शक, पंच, स्वयंसेवक व तेंग सु-डो असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जवळखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचा एचपीव्ही लसीकरणाबाबत सकारात्मक संदेश...

## आरोग्य सेविकेचा पुढाकार; एचपीव्ही लसीकरणावर वाढला विश्वास

**जनसंचलन/बुलढाणा**

प्राथमिक आरोग्य केंद्र, जवळखेड येथे एचपीव्ही () लसीकरणाबाबत सकारात्मक व प्रेरणादायी संदेश देणारी घटना घडली असून, आरोग्य सेविका () वर्षा नागरे यांनी स्वतःच्या मुलीला लस देऊन समाजात विश्वास निर्माण करण्याचे उल्लेखनीय कार्य केले आहे.





ग्रामीण भागात लसीकरणाबाबत अनेकदा भीती, अफवा व गैरसमज आढळून येतात. या पार्श्वभूमीवर वर्षाताई नागरे यांनी स्वतःच्या कृतीतून ङ्खआधी केले मग सांगितलेफ्रया तत्त्वाचा अवलंब करत नागरिकांसमोर विश्वासार्ह उदाहरण ठेवले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे परिसरातील पालकांमध्ये सकारात्मक चर्चा सुरू झाली असून, अनेकांनी आपल्या मुलींच्या लसीकरणाबाबत पुढाकार घेण्याची तयारी दर्शविली आहे. (ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस) हा संसर्गजन्य विषाणू असून, त्यातून पुढे गर्भाशयाच्या कर्करोगाचा धोका निर्माण होऊ शकतो. भारतात महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण लक्षणीय आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लसीकरण अत्यंत प्रभावी मानले जाते. तज्ज्ञांच्या मते, ९ ते १४ वयोगटातील मुलींना ही लस दिल्यास भविष्यातील धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. आरोग्य विभागामार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत असून, शाळा, अंगणवाडी व गावपातळीवर जनजागृती करण्यात येत आहे. आशा वर्कर, आणि आरोग्य कर्मचारी घरभेटीद्वारे पालकांना समुपदेशन करत आहेत. यावेळी वर्षा नागरे म्हणाल्या, ङ्खलसीकरणाबाबत भीती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही. मी माझ्या स्वतःच्या मुलीला लस दिली आहे, कारण तिचे आरोग्य माझ्यासाठी सर्वात महत्त्वाचे आहे. प्रत्येक पालकाने आपल्या मुलीच्या सुरक्षित भविष्यासाठी हा निर्णय घ्यावा.फ्र तसेच, संबंधित जनजागृतीपर व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जेणेकरून अधिकाधिक लोकांपर्यंत योग्य माहिती पोहोचेल आणि गैरसमज दूर होतील. आरोग्य विभागाने स्पष्ट केले की, लस सुरक्षित, प्रमाणित व प्रभावी असून ती शासनाच्या आरोग्य सेवांद्वारे उपलब्ध आहे. पालकांनी पुढाकार घेऊन पात्र मुलींचे वेळेत लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ङ्खआज घेतलेला योग्य निर्णय उद्याच्या आरोग्यदायी आयुष्याची हमी ठरतो,फ्र असा संदेश देत आरोग्य विभागाने नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# ज्ञानगंगा अभयारण्य मार्ग रात्री बंद; पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

**जनसंचलन/ बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील महत्त्वाचे पर्यटन व जैववैविध्य स्थळ असलेल्या ज्ञानगंगा अभयारण्यातून जाणारा खामगांवबोथाबुलढाणा राज्य मार्ग क्र. २४ हा दररोज रात्री १० ते सकाळी ५ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती वन विभागाने दिली आहे. वन्यजीव संवर्धन व वन संरक्षणाच्या दृष्टीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, बुलढाणा यांच्या आदेशानुसार हा निर्णय लागू करण्यात आला आहे. या मार्गावर खामगांव, बोथा, गोंधनखेड आणि वरवंड येथे एकूण चार वनउपज तपासणी नाके कार्यरत असून संबंधित वेळेत वनकर्मचारी वाहनांची तपासणी करून नोंदी घेतात. तथापि, काही वाहनचालकांकडून रात्रीच्या वेळी नियमांचे उल्लंघन करून तपासणी नाक्यांवरील कर्मचाऱ्यांशी वाद घालण्याचे प्रकार समोर येत आहेत. अशा कृतींमुळे वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत दंड व शिक्षेची तरतूद असून संबंधितांवर फौजदारी कारवाई होऊ शकते, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. वन विभागाच्या माहितीनुसार, रात्रीच्या वेळेस या परिसरात वाघ, बिबट्या आणि अस्वल यांसारख्या वन्यप्राण्यांचा मुक्त संचार असतो. त्यामुळे वाहनांमुळे अपघात होण्याची तसेच वन्यजीवांच्या अधिवासाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणूनच नागरिकांनी रात्री १० ते सकाळी ५ या वेळेत या मार्गावर प्रवास टाळावा आणि खामगांवउंद्रीवरवंडबुलढाणा या पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.



# अफवांचा स्फोट! पेट्रोलसाठी झुंबड, साठेबाजांवर जिल्हाधिकाऱ्यांचा कडक डंडा

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल तुटवडा होणार असल्याच्या अफवांनी नागरिकांमध्ये एकच खळबळ उडवली असून अनेक ठिकाणी पेट्रोल पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याचे चित्र दिसून आले. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी तातडीने हस्तक्षेप करत कडक आदेश जारी केले आहेत. जिल्हा पुरवठा विभागाच्या माहितीनुसार, सोशल मीडियावर पसरलेल्या खोट्या बातम्यांमुळे नागरिक अनावश्यकपणे इंधन साठवण्याच्या प्रयत्नात आहेत. यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. नवीन आदेशानुसार, कोणत्याही पेट्रोल पंपावरून पेट्रोल किंवा डिझेल प्लास्टिक बाटली, कॅन किंवा इतर अनधिकृत भांड्यात देण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. इंधन केवळ वाहनांच्या टाकीतच भरणे बंधनकारक करण्यात आले असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, सर्व पेट्रोल पंपांवर सीसीटीव्ही यंत्रणा सुरू ठेवणे, रोजच्या साठ्याची माहिती फलकावर प्रदर्शित करणे आणि रुग्णवाहिका व अत्यावश्यक सेवांना प्राधान्याने इंधन पुरवठा करणे अनिवार्य करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांनाही स्पष्ट संदेश दिला आहे की, कोणत्याही



अफवांवर विश्वास ठेवू नका आणि गरजेपेक्षा जास्त इंधन साठवू नका.फ्क अफवा पसरवणाऱ्यांवरही कठोर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या आदेशामुळे इंधन साठेबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून प्रशासन आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी हा आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला आहे.

# दुसरबीड विकासापासून वंचित? ग्रामसचिवालयात पंतप्रधानांची प्रतिमा देत भाजपा पदाधिकाऱ्यांचा सवाल!

**जनसंचलन/दुसरबीड**

गाव अजूनही विकासाच्या प्रतीक्षेतच का?फ्क असा थेट आणि आक्रमक सवाल उपस्थित करत सिदखेड राजा तालुका भाजप पदाधिकाऱ्यांनी ग्रामसचिवालयात जोरदार उपस्थिती लावली. दिनांक २५ रोजी ग्रामसचिवालय, दुसरबीड येथे देशाचे पंतप्रधान यांची प्रतिमा सप्रेम भेट देत ङ्कङ्कआता तरी विकास कामांना गती द्याफ्क असा स्पष्ट इशारा देण्यात आला. या वेळी तालुका उपाध्यक्ष सुरेश बुलकडे, अल्पसंख्यक जिल्हा महामंत्री शेख जावेद, एससी सेलचे जिल्हा महामंत्री नानासाहेब तौर, तसेच गजानन सोनवणे आणि शेख फय्युम यांनी प्रशासनाला जाब विचारला. ङ्कङ्ककेंद्र सरकार योजना देते, पण स्थानिक पातळीवर अंमलबजावणी का होत नाही?फ्क असा संतप्त सवाल उपस्थित करण्यात आला. कार्यक्रमावेळी ग्रामविकास अधिकारी अशोक बनकर, ग्रामप्रशासक, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, ङ्कङ्कप्रतिमा देऊन नव्हे तर काम करून दाखवाफ्क अशी ग्रामस्थांमध्येही जोरदार चर्चा रंगली असून, दुसरबीडच्या विकासाचा मुद्दा आता पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# नवीन पूल बांधला सहा महिन्यातच पाडला!; लाखोंचा निधी पाण्यात, जबाबदार कोण?

**जनसंचलन/ जळगाव जा**

ग्रामीण विकासाच्या नावाखाली कोट्यवधींचा निधी खर्च होत असल्याचा दावा केला जात असतानाच जळगाव जामोद तालुक्यातील सुनगाव येथे धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. १५ व्या वित्त आयोगातून बांधलेला पाईप कलव्हर्ट पूल अवघ्या काही महिन्यांतच पाडून त्याच ठिकाणी पुन्हा नवीन पुलाचे काम सुरू केल्याने मोठा गैरप्रकार समोर आला आहे. सुनगाव येथील लेंडी नदीवर गोरक्षनाथ महाराज मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर २०२२-२३ मध्ये हा पूल उभारण्यात आला होता. मात्र सुरुवातीपासूनच काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला होता. ग्रामसभेने आक्षेप घेतल्यानंतरही संबंधित कंत्राटदाराला तब्बल ४ लाख ८० हजार ८११ रुपयांचे बिल नियमबाह्य पद्धतीने अदा करण्यात आले, ही बाब अधिकच संशयास्पद ठरत आहे. यापेक्षा गंभीर बाब म्हणजे मार्च २०२४ मध्ये पूर्ण झालेला पूल सप्टेंबर २०२५ मध्ये अचानक पाडण्यात आला.



विशेष म्हणजे, पुलाच्या तोडफोडीसाठी कोणतीही अधिकृत परवानगी किंवा ग्रामपंचायतीचा ठराव नसल्याचे ग्रामसेवकांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, आता त्याच जागी पुन्हा ३४.६२ लाख रुपये खर्चून नवीन पूल व संरक्षक भिंतीचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे हा संपूर्ण प्रकार म्हणजे सरकारी निधीची उघड उधळपट्टी आणि संगनमताचा संशय व्यक्त होत आहे. या प्रकरणी इंजि. राजू समाधान इंगळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पुराव्यासह तक्रार दाखल केली असून, अवघ्या काही महिन्यांत पूल पाडण्याची वेळ का आली? बिल कोणी मंजूर केले? जुन्या पुलाचा हिशोब कुठे आहे?फ्क असे थेट सवाल उपस्थित केले आहेत. या तक्रारीमुळे जिल्हा परिषद व बांधकाम विभागात खळबळ उडाली असून, आता प्रशासन दोषींवर कारवाई करते की प्रकरण दडपते, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे

# रामनवमीचा जल्लोष! संतनगरी शेगावात भक्तांची उसळली गर्दी



**जनसंचलन/ शेगाव**

विदर्भाची प्रति पंढरपूर म्हणून ओळख असलेल्या संतनगरी शेगावात आज रामनवमीचा उत्सव भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. सकाळी नित्यक्रमानुसार पहाटे सात वाजता झालेल्या श्रींच्या आरतीने उत्सवाला मंगल सुरुवात झाली. राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक दर्शनासाठी शेगावात दाखल झाले असून संपूर्ण नगरीत ङ्कङ्कजय श्रीराममफ्क चा गजर घुमत आहे. विशेष म्हणजे यंदा ७०० पेक्षा अधिक वारकरी दिंड्या संतनगरीत दाखल झाल्याने भक्तीचा उत्साह अधिकच द्विगुणित झाला आहे. दिवसभर विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी श्रींच्या रजत मुखवट्याची भव्य नगर परिक्रमा काढण्यात येणार असून, त्यात हजारो भाविक सहभागी होणार आहेत. संध्याकाळी वारकऱ्यांच्या पारंपरिक रिंगण सोहळ्याने उत्सवाची सांगता होणार आहे. शेगाव नगरीत सध्या सर्वत्र भक्तिभाव, उत्साह आणि आध्यात्मिक उर्जा अनुभवायला मिळत असून, भाविकांच्या उपस्थितीने संतनगरी अक्षरशः फुलून गेली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८